महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२९५९३८१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/१६७३/२०२५-२६ दिनांक – १९/०५/२०२५

# परिपत्रक

**विषय :- MBA CAT/CMAT CET, UGC NET/CSIR/MH-SET, Military Bharti परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता विद्यार्थांची निवड करण्याकरिता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची मेरीट यादी व UGC NET/CSIR/MH-SET करिता सुधारित उत्तरपत्रिका महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

१.महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या MBA CAT/CMAT CET, UGC NET/CSIR/MH-SET, Military Bharti परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता विद्यार्थांची निवड करण्याकरिता चाळणी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर दि.११/०५/२०२५ रोजी घेण्यात आलेली होती.

२.सदर चाळणी परीक्षांची उत्तरपत्रिका महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१३/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करून विद्यार्थांना उत्तरपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नांवर आक्षेप असल्यास त्याबाबतचे आक्षेप नोंदविण्याकरिता आक्षेप फलकाची लिंक दि.१४/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजे पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

३.दि.१४/०५/२०२५ रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निराकरण करून UGC NET/CSIR/MH-SET परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेची सुधारीत उत्तरपत्रिका महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

४. MBA CAT/CMAT CET व Military Bharti च्या उत्तरपत्रिकेकरिता प्राप्त झालेले आक्षेप वैध नसल्यामुळे सदर परीक्षांच्या उत्तरपत्रिकेत कोणत्याही प्रकारचे बदल करण्याची आवश्यकता नाही.

५.MBA CAT/CMAT CET, UGC NET/CSIR/MH-SET, Military Bharti परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता विद्यार्थांची निवड करण्याकरिता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची मेरीट यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

६.सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(विकास गडपायले)**
**प्रकल्प व्यवस्थापक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**